INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

August 2021

E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Special Issue 272

# उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१



**विशेषांक संपादक :**
संदीप तुंडूरवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

**मुख्य संपादक :**
डॉ. धनराज धनगर

**विशेषांक सहसंपादक :**
डॉ. दिनकर चौधरी
डॉ. अमर बोंदरे
डॉ. बाळासाहेब जोगदंड
डॉ. बबीता सिंग
डॉ. संतोष डाखरे

**विशेष सहाय्य :**
प्रा. भास्कर वघाळे

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

August-2021 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

**PEER REFEREED & INDEXED JOURNAL**

**Special Issue 272**

# उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१

विशेषांक संपादक :
संदीप तुंडूरवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर

विशेषांक सहसंपादक
डॉ. दिनकर चौधरी
डॉ. अमर बोंदरे
डॉ. बाळासाहेब जोगदंड
डॉ. बबीता सिंग
डॉ. संतोष डाखरे

विशेष सहाय्य :
प्रा. भास्कर वघाळे

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo (Source) : Internet

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

## अनुक्रमणिका


| अ.नं. | शीर्षक | लेखक /लेखिका | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | उदारीकरणानंतरचा भारत | श्री. अच्युत गोडबोले | 07 |
| 2 | उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१उदारीकरणातून उद्भवलेल्या समस्या-एक दृष्टिक्षेप | डॉ. अलका देशमुख | 16 |
| 3 | उदारीकरण-खासगीकरण- जागतिकीकरण: एक चिकित्सक अध्ययन | डॉ. सुभाष उपाते | 22 |
| 4 | उदारवादातून उदभवलेले प्रश्न, समस्या त्यावरील उपाय | डॉ. विनोद मुडे | 30 |
| 5 | 1991 ते 2021 या कालावधीतील भारतीय पंतप्रधानाची उदारीकरणाबाबतची भूमिका आणि त्यांचा दृष्टीकोन | डॉ. राहुल खरात | 35 |
| 6 | भारतीय लोकशाही आणि जागतिकीकरण | प्रा. हरीषकुमार किनकर | 46 |
| 7 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | डॉ. नरेंद्र ई. घरत, डॉ. भुपेन्द्र ई. घरत | 51 |
| 8 | पी. व्ही. नरसिंहरावांचे नेतृत्व व उदारीकरण | डॉ. ज्योती कवठे | 55 |
| 9 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे उदारीकरणाचे धोरण आणि लोककल्याणकारी लोकशाहीबाबतची भूमिका | प्रा. भास्कर वघाळे, डॉ. रायन महाजन | 61 |
| 10 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | डॉ. सुशांत चिमणकर | 66 |
| 11 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | प्रा. पुनम देशमुख | 73 |
| 12 | पी. व्ही. नरसिंहराव: भारतीय उदारीकरणाचे शिल्पकार | डॉ. नंदाजी सातपुते | 76 |
| 13 | पी. व्ही. नरसिंहराव: भारतीय आर्थिक उदारीकरणाचे प्रणेते | डॉ. संजय गोरे | 79 |
| 14 | 21 व्या शतकातील भारत आणि मोदीकालीन परराष्ट्र धोरणाची दिशा | डॉ. रतन राठोड | 82 |
| 15 | उदारीकरणामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेला बदल | प्रा. तानाजी माने | 88 |
| 16 | उदारमतवाद: भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सामर्थ्य | डॉ. वैशाली प्र. सुपेकर | 94 |
| 17 | उदारीकरणानंतरचे भारतीय संघराज्य | प्रा. डी. डी. ठाकरे | 97 |
| 18 | उदारीकरण आणि भारत | प्रा. लोमेश बावनकुळे | 103 |
| 19 | उदारीकरणानंतरची जागतिक व भारतीय लोकशाही - | डॉ. सुनंदा अ. राऊत | 107 |
| 20 | भारताततील उदारवादाची वाटचाल | डॉ. संतोष सं. डाखरे | 113 |
| 21 | उदारमतवाद अर्थ, मुलतत्वे आणि उदारमतवादाचे नवस्वरूप व मूल्यमापन | डॉ.विलास टाले | 118 |
| 22 | राजकीय पक्षांच्या विचारधारा आणि उदारवादी भारत | प्रा. लालचंद मेश्राम | 124 |
| 23 | भारतातील उदारीकरण आणि व्यवस्थेतील बदलते प्रवाह | डॉ. अमर बोंदरे | 127 |
| 24 | 21 व्या शतकातील उदारमतवादी धोरण | डॉ. कल्पना आर. टेकाडे | 132 |
| 25 | कोरोना परिस्थितीतील आरोग्य व्यवस्थेसह सार्वजनिक संस्थांचा उदारवाद | डॉ. विनोद गायकवाड | 137 |
| 26 | उदारीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम | डॉ. अमित पांडे | 142 |
| 27 | उदारीकरणानंतरचा भारत (१९९१-२०२१) | डॉ. मारोती घंटेवाड | 147 |
| 28 | उदारीकरणानंतर भारतातील उच्च शिक्षणापुढील अव्हाने आणि जागतिक स्पर्धा | डॉ. सविता झुंजारे | 152 |
| 29 | उदारवादातून उद्भवलेले प्रश्न, समस्या व त्यावरील उपाय | डॉ. दिनकर चौधरी | 156 |




Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021


| | | | |
|---|---|---|---|
| 30 | 1991 नंतरचे उदारीकरण आणि भारतीय विकास | डॉ. विठ्ठल मंदुलवार | 160 |
| 31 | उदारमतवादातुन उद्भवलेले प्रश्न, समस्या व उपाय योजना १९९१ ते २०२१ | डॉ. अर्चना उमरकर | 166 |
| 32 | उदारवाद आणि बदललेली भारतीय समाजव्यवस्था | डॉ. राजेंद्र मुद्दमवार | 172 |
| 33 | उदारवादी भारताची आर्थिक संरचना आणि त्यांचे समाज व्यवस्थेवरील पडसाद | डॉ. अजय पे. बोरकर | 176 |
| 34 | उदारीकरणानंतरचा भारत: नवे पर्व, नवे प्रश्न | डॉ. रिता धांडेकर | 182 |
| 35 | उदारीकरणाचा भारतावरील सांस्कृतिक प्रभाव | डॉ. पितांबर भा. उरकुडे | 186 |
| 36 | आर्थिक धोरण व व्यवस्थांचे बदलते स्वरुप | डॉ. नितिन गायकवाड | 189 |
| 37 | भारतातील शिक्षणावर उदारवादाचा झालेला परिणाम | डॉ. विमल राठोड | 193 |
| 38 | जागतिकीकरण: भारताच्या शिक्षणव्यवस्थेवरील एक आव्हाण | डॉ. वामन खोब्रागडे | 201 |
| 39 | उदारीकरणानंतरच्या भारताचे लोकशाही प्रारुप | डॉ. हिराचंद वेस्कडे | 208 |
| 40 | भारतीय राज्यव्यवस्थेतील स्वातंत्र्योत्तर काळातील स्थित्यंतरे: एक राजकीय विश्लेपण | डॉ. मंगेश आचार्य | 210 |
| 41 | उदारीकरण व सामाजिक घटक: एक अध्ययन | डॉ. अनिल बनकर | 217 |
| 42 | उदारीकरणानंतर प्रशासन रचनेतील मूलगामी बदल आणि त्याची परिणामकारकता | डॉ. बाळासाहेब जोगदंड | 223 |
| 43 | उदारमतवाद संदर्भातील लोकशाही व्यवस्था | डॉ. वकील शेख | 227 |
| 44 | उदारीकरणानंतरच्या काळातील महाराष्ट्रातील स्थित्यंतरे | प्रा. श्रीकांत शेंडे | 231 |
| 45 | उदारीकरणात अर्थमंत्री मनमोहन सिंग यांची भूमिका व त्याचे फायदे | डॉ. लक्ष्मण शिराळे | 235 |
| 46 | उदारीकरणानंतरचा भारत: साध्य आणि साध्यता | संदिप तुंडूरवार, डॉ. शरद सांबारे, डॉ. राहुल बावगे | 240 |
| 47 | उदारीकरण का भारत के विविध आयामों पर प्रभाव | डॉ. अर्चना पाटील | 251 |
| 48 | Concept of Liberalism | Dr. Mahesh Patil | 255 |
| 49 | The Study of Foreign Policy in International Relation 1991-2024 | Mr. Chandrakant Dhumale | 260 |
| 50 | The Role of liberalism in opening the framework of India's Foreign Policy | Dr. Ashwini Thakre | 265 |
| 51 | The Impact & Effectiveness of Liberalism on Education, Health & Social sector | Dr. Alpana Vaidya | 269 |
| 52 | Effect of economic liberalisation on Indian media | Dr. Namrata Mishra | 273 |
| 53 | Impact of Liberalisation on Wages and Employment In Indian Manufacturing Industries | Prof. Rahul Mahure | 277 |
| 54 | The Work and the Approach of the Election Commission of Liberal India | Dr. Manish Sonawane | 282 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

# पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ

डॉ. नरेंद्र ईश्वर घरत
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर.

डॉ. भुपेन्द्र ईश्वर घरत
राज्यशास्त्र विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

भारतीय प्रजासत्ताकाचे उद्धारपर्व सन 1991 पासून प्रारंभास आले. 1991 च्या अर्थसंकल्पाव्दारे आधुनिक भारताचा पाया रचला गेला आणि देशात नविन आर्थिक सुधारणांव्दारे पुढे वाटचाल करण्यासाठी मार्ग तयार करण्यात आला. या नविन आर्थिक उदारीकरणाला आणि मुक्त व्यापारी धोरणाला आज जवळपास 30 वर्ष झाली आहेत. या रोपट्याची मुळे आता खोलवर रूजलेली असून वटवृक्षात रूपातरीत झाली आहे. सन 2008 ला जगभर आलेल्या जागतिक आर्थिक मंदीचा फटका अमेरिकेसारख्या देशालाही बसला, परंतू त्या मंदीतही भारत हा तटस्थपणे उभा राहीला याचे श्रेय तत्कालीन पंतप्रधान श्री. नरसिंहराव यांनी राबविलेल्या धाडसी निर्णयांचाच परीपाक आहे. म्हणून त्यांना आर्थिक उदारीकरण क्रांतीचे जनक म्हणून संबोधले जाते.

**भारताची सन 1991 पूर्वी व दरम्यानची आर्थिक राजकीय स्थिती :—**

सन 1991 ला भारत देश भीषण आर्थिक संकटाच्या गर्तेत होता, सर्वच क्षेत्रे रसातळाला पोहचली होती. मात्र जनसामान्य भारतवासीयांना कोणतेही सोयीरसूतक नव्हते, त्यांचे दैनदिन व्यवहार आर्थिक अधोगतीच्या परीणामाने कोलमोडून पडले नाही. मात्र केंद्रातील सत्ताधिश आणि उद्योगपतींना या संकटाचे गांभीर्य कळले होते. लोक कल्याणकारी धोरणांमुळे यांची झळ जनसामान्यांना बसू नये यांची खबरदारी घेण्यात आली. या दरम्यान, 1989 ते 1991 च्या मे महिन्यापर्यंत दोन पंतप्रधान कॉग्रेस पक्षाच्या पाठींब्यावर अल्पमतात नियुक्त झाले होते. याच दरम्यानच्या काळात देशा समोरील यक्ष प्रश्न अधिक जटील होत गेले. मंडलवाद, अयोध्या रामजन्मभूमीवाद, फुटीरतावादी विचारधारांचा स्तोम, दिवसागणीक होत असलेली विकासदरांची घसरण त्याचप्रमाणे परकीय चलन लगबघ 15 दिवस पुरेल इतकेच शिल्लक होते. परीणामतः अनेक उद्योग धंदे मोडकळीस आले.[1] परदेशी गुंतवणूकदार आणि अनिवासी भारतीय यांनी देशातील आपली गुंतवणूक काढण्यास सुरूवात केली त्यामूळे भारतीय अर्थव्यवस्थेचा संपूर्ण डोलारा उध्वस्त झाला होता. तसेच प्रशासकीय यंत्रणा हतबल ठरली होती. अशा बिकट परिस्थितीत क्षीण झालेल्या अर्थव्यवस्थेला संपुर्ण राजकीय पक्षानी एकत्र बसून देशाला आर्थिक विवंचनेतून बाहेर काढण्याची गरज होती, परंतू सत्तालोभाचे मृगजळ अनाठायी बाळगल्याने अशा बिकट स्थितीत खर्चिक सार्वत्रिक निवडणूकीत सामोरे जाण्यास धन्यता मानली.

**श्री. नरसिंहराव यांचे नेतृत्व :—**

केंद्रातील चंद्रशेखर यांचे सरकार कोसळल्यानंतर देशातील निवडणुक प्रचाराचा झंझावात सुरू झाला होता. निवडणुकांच्या ऐन मध्यात 21 मे 1991 रोजी कॉग्रेस पक्षाचे अध्यक्ष राजीव गांधी- यांची तामीळनाडूत निर्घृण हत्या[2] झाल्यामुळे कॉग्रेस पक्षात नैराश्याचे वातावरण घोंघावले. आशेचा एकमेव किरण लुप्त झाला होता, त्यामुळे कॉग्रेस समोर पक्षनेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. पक्षाला सहानुभूतीचा फायदा मिळण्याची शक्यता गृहीत धरून पूढे ढकलण्यात आलेल्या लोकसभा निवडणुकांसंबधी योजनाबध्द कार्यक्रम आखता यावा म्हणून पक्षाध्यक्षाची तातडीने निवड होणे अत्यंत निकडीचे होते. याबाबत प्रथम वारसदार म्हणून सोनिया गांधींना विचारण्यात आले, मात्र त्यांनी नेतृत्व



Scanned with CamScanner

स्विकारण्यास नकार दिल्यानंतर पक्षश्रेष्ठींनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राजीव गांधींचे निष्ठावान सल्लागार, धुरंधर राजकारणी, दुरदृष्टी आणि चाणक्यनितीत पारंगत असलेल्या पी.व्ही नरसिंहराव यांची पक्षाध्यक्षपदी निवड केली, आणि निवडणुकीनंतर अल्पमतातील सरकारचे प्रमुख म्हणून देशाच्या पंतप्रधान पदाची धुराही त्यांच्या खांद्यावर देण्यात आली.

ही परिस्थिती मात्र जल्लोषात रमण्याची नव्हती, पंजाबमधील दहशतवादी कारवाया, अयोध्येतील राममंदिर आंदोलन यातच आर्थिक आघाडीवर आणीबाणीची स्थिती, चंद्रशेखर पंतप्रधान असतांना देशावर सोने गहाण ठेवण्याची आलेली नामुष्की, आखाती युध्दामूळे इराक आणि कुवेत मधून हजारो कामगाराचे देशात पलायन, मंडल आयोगाच्या शिफारशीच्या अमंलबजावणीमुळे परसलेला असंतोष, अनिवासी भारतीय आपल्या ठेवी भारतीय बॅकामधुन काढुन घेऊ लागले. परिणामस्वरूप परकीय चलनसाठा कमी होत गेला. आंतरदेशीय व्याजदर वाढल्याने कर्ज काढणे देशाला अवघड होत गेले. चलनवाढीने तर 16 टक्क्यांची वेस ओलांडली होती. अशा देशातंर्गत राजकीय आणि आर्थिक या दोन्ही आघाड्यावर परिस्थती बिकट असतांना पी.व्ही नरसिंहराव यांनी देशाचे नेतृत्व स्वीकारले होते.[3] ही वेळ भारतीय अर्थव्यवस्थेला हादरे देणारी होती कारण, भारतीय अर्थव्यवस्थेची गाडी पुर्णपणे रूळावरून घसरली होती.

20 जून 1991 रोजी कॅबीनेट सेक्रेटरी नरेश चंद्रा हे 8 पानाची एक नोट्स घेऊन पी.व्ही नरसिंहराव यांच्याकडे गेले. प्रामुख्याने ती नोट्स येणाऱ्या पंतप्रधानांनी आणि काही मंत्रालयांनी विशेषतः अर्थमंत्रालयाने कोणती पाऊले तातडीने उचलायला हवी यांची कल्पना देणारी होती, ती नोट्स वाचतांना पी.व्ही नरसिंहराव यांनी कॅबिनेट सेक्रेटरी नरेश चन्द्रा यांना प्रश्न केला की, 'खरच देशाची आर्थिक परिस्थिती इतकी बिकट आहे ?' यावर चंद्रा यांनी 'नाही .... याहून अधिक बिकट आहे' असे उत्तर दिले.[4] त्यानंतर चंद्रा यांनी चंद्रशेखर पंतप्रधान असतांना केलेल्या प्रयत्नांची माहीती दिली आणि कोणत्याही स्थितीत देशावर दिवाळखोरीची स्थिती येणार नाही यासाठी आपण प्रयत्न करण्याची गरज असल्याचे नरसिंहरावांना सांगितले. देशासमोर असलेला आर्थिक पेच सोडविण्यासाठी एखाद्या अर्थतज्ज्ञाची गरज असल्याचे पी.व्ही नरसिंहराव यांना कळले आणि त्यांनी तातडीने अर्थमंत्री पदासाठी उमेदवार शोधण्यास सुरूवात केली.

**पी.व्ही नरसिंहरावाची सत्वपरीक्षा आणि अर्थमंत्री निवड :–**

'पैशाने सोंगे विकत घेता येतात, पण पैशाचे सोंग करता येत नाही' या युक्तीप्रमाणे आर्थिक संकटाची वाच्यता नव्हे तर ठोस कृती करणे गरजेचे होते. आर्थिक स्थिती बिकट असतांना धाडसी आणि तितकेच सुजाण निर्णय घेणाऱ्या व्यक्तीला अर्थमंत्री करणे आवश्यक होते. कारण देशाची पुढील वाटचाल ही केवळ कर्तुत्वावर व क्षमतेवर अवलंबून होती. मंत्रीमंडळ निवडीत एक – दोन सदस्य या पदासाठी उत्सुक होते मात्र आय. जी. पटेल यांनी या पदासाठी नकार दिल्यानंतर डॉ. मनमोहन सिंग यांना बोलावणे पाठविले. त्यांच्या शंकाकुशंकाचे पुर्णपणे निराकरण झाल्यानंतर त्यांनी या पदासाठी होकार दिला.

पी.व्ही नरसिंहरावांना या पदासाठी जागतिक आर्थिक परीस्थितीचा सखोल अभ्यास असणाऱ्या अर्थतज्ज्ञ आणि प्रशासकीय अनुभव असलेली विशेष म्हणजे कोणत्याही दबावाला बळी न पडणारी व्यक्ती हवी होती. या सर्वांचा मिलाप मनमोहन सिंग यांच्या अर्थमंत्रीपदी निवडीत झाला.

डॉ. मनमोहन सिंग हे राजकारणाबाहेरचे असल्याने मंत्री पदाचा कारभार सांभाळताच कामाचा धडाका लावत देशाच्या अर्थव्यवस्थेचे चित्र न लपविता संसद सदस्यांसमोर मांडण्यास सुरूवात केली. निवडणुक काळात कॉंग्रेस पक्षाने वर्तमानपत्र छपाई कागद, केरोसीन, मीठ, डिझेल, सायकल, दुचाकीवाहन, बल्ब, सुती साडी, धोतरे, खाद्यतेल, स्टोव्ह अशा जीवनावश्यक वस्तुंची दरे स्थिर ठेऊन



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

10 जुलै 1990 च्या दरापर्यंत नेऊ असे आश्वासन दिले होते. मात्र 25 जून 1991 रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी आपल्याकडे कोणतीही जादूची कांडी नाही तसेच, सरकारने दिलेले आश्वासन पुर्ण करण्यासाठी कोणतीही यंत्रणा तसेच आर्थिक स्थिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.[5] त्यांच्या या वक्तव्यावरून कॉग्रेस पक्षातच गोंधळ उडाला, आधीच नाजूक स्थितीत असलेल्या सरकारमध्ये काही खासदारांनी पंतप्रधानाकडे नाराजी व्यक्त केली पण हे प्रकरण लवकरच शांत झाले.

**रूपयाचे अवमूल्यन – सोने गहाण ( प्रथम अर्थसंकल्प ) :–**

पक्षश्रेष्ठींची नाराजी आणि देशातील जनतेचा रोष बघून पंतप्रधान नरसिंहराव, अर्थमंत्री मनमोहन सिंग आणि रिझर्व्ह बॅक यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. 1 जुलै 1990 रोजी डॉलर्स, येन, पौंड, मार्क, फ्रॅंक यांच्या तुलनेत रूपयाची किंमत 7 टक्के कमी करण्यात आली. त्यानंतर लगेचच 3 जुलै रोजी 11 टक्क्यांनी कमी करण्यात आली. या दरम्यान आयात करीत असलेल्या वस्तुंचे बिल देण्यासाठी सरकारला परकीय चलनांची मोठी गरज होती. त्या आधीच्या चंद्रशेखर सरकारने 16 मे रोजी 20 मॅट्रीक टन सोने युनायटेड बॅक ऑफ स्वित्झरलॅण्ड कडे सोपविले होते. नरसिंहराव सरकारने 04, 07, 11, 18 या चार दिवसामध्ये 46.91 मॅट्रीक टन सोने बॅक ऑफ इंग्लडकडे सोपविण्याचा निर्णय घेतला. यातून 16 मे रोजी 20 कोटी डॉलर्स आणि पुढील 4 टप्प्यामध्ये 40 कोटी डॉलर उपलब्ध झाले.[6] आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून आर्थिक साह्य घेणे गरजेचे होते आणि यासाठी सोने गहाण ठेवणे धोरणात्मकदृष्ट्या निकडीचे होते. अर्थातच, संसदेत या निर्णयावर जबरदस्त टिका करण्यात आली. संसदेतील सदस्याच्या प्रश्नांना अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी शांतपणे उत्तरे दिली. सुरक्षिततेच्या कारणास्तव या निर्णयाचा गाजावाजा न करता तो अंमलात आणण्याची गरज होती 'आणि यापुढे सोने गहाण ठेवण्याची नामुष्की येणार नाही असेही स्पष्ट केले. यासोबत, उद्योगांना सरकारी मक्तेदारीतून मुक्त करण्याचा निर्णय क्रमप्राप्त असल्याने उद्योग धोरणातही अनेक बदल केले. याच अर्थसंकल्पात इंधनाबरोबरच खतावरील अनुदान कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे कॉग्रेस पक्षातच अनेक सदस्याने त्यांच्याविरूध्द तक्रार करण्यास सुरूवात केली. परिस्थितीशी समन्वय साधता खतावरील अनुदानाचा निर्णय मागे घ्यावा लागला. अशा अनेक धोरणात्मक क्रांतीकारी निर्णयाव्दारे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल सुकर करण्यात आली.

24 जुलै 1991 च्या अर्थसंकल्पात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरणाचा अवलंब करून भारताने आपल्या अर्थव्यवस्थेची दारे जगासाठी खुली केलीत. आज त्याला तीन दशके उलटल्यांनतर त्याचे चांगले वाईट परीणाम सहाजिकच दिसून येतात. देशाच्या अर्थकारणाबरोबरच राजकारण आणि समाजकारणाही कलाटणी देण्याऱ्या पंतप्रधान नरसिंहराव यांनी उदारीकरणावर आपली अमीट छाप उमटवली. या आर्थिक उदारीकरणाचे श्रेय नरसिंहराव आणि मनमोहन सिंग या जोडीला दिल्यास वावगे ठरणार नाही.

**गांधी नेहरूंचा वारसा आणि आर्थिक सुधारणा :–**

नरसिंहराव हे धुरीण आणि मातब्बर राजकारणी होते तर मनमोहन सिंग हे जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ, तसे हे दोघेही समाजवादी विचारांच्या ओंजळीत वाढलेले पण भाडवंलवादाला सैतान मानणाऱ्या गटामध्ये ते कधीच राहिले नाही. ज्या गांधी, नेहरू अर्थातच कॉग्रेस पक्षाने चार दशके समाजवादी विचारावर भारतीय अर्थव्यवस्थेची भलावण केली, त्याच पक्षाच्या अल्पमताच्या सरकारने आय.एम.एफ, जागतिक बॅक या सारख्या भाडंवलवादी आंतरराष्ट्रीय संघटनांच्या पंगतीला बसवुन आपली अर्थनीती आणि गती बदलली होती.



Scanned with CamScanner

सन 1992 च्या तिरूपती मध्ये झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनात नरसिंहराव व मनमोहन सिंग यांनी आपल्या भाषणात, सातत्याने पंडीत नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या स्वप्नांना प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण निर्णय घेत असल्याचे सुतवाच केले. आर्थिक उदारीकरणाला कॉंग्रेसमधुनच होत असलेला विरोध या दोन नेत्यांनी शेवटपर्यंत इन्द्रधनुष्य समान पेलला.

उदारीकरणाच्या धोरणामुळे किती फायदा–तोटा झाला याबाबत मतभेद असणे स्वाभाविक आहे, परंतू उदारीकरणाच्या धोरणाचे पुरस्कर्ते याला संटकाच्या रूपाने आलेले वरदान मानतात तर विरोधक भारतीय अर्थव्यवस्था भांडवलदाराच्या दावणीला बांधली अशी उपरोधिक टिका करतात. भारतीय अर्थव्यवस्था खुली करणे, उद्योग निर्बंध व नियंत्रण मुक्त करणे किंवा सरकारी हस्तक्षेप कमी करणे, उद्योगधंद्यामध्ये स्पर्धाशक्ती वाढीला लावणे आणि भारतीय अर्थव्यवस्था बाजाराधिष्ठीत करणे आवश्यक होते. हा मार्ग इतर देशांनी अगोदरच स्वीकारला असल्याने भारताला या जंजाळाच्या स्पर्धेत टिकुन राहण्यासाठी उदारीकरणाचा मार्ग स्वीकारावा लागला हे निष्कर्षाअंती दिसून येते.

**संदर्भग्रंथ**

1. भागवत विद्युत, समकालीन भारतीय समाज, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पेज क्र. 74.
2. संपादक बाळ प्रकाश, बेडकीहाळ किशोर, भारतीय राजकीय व्यवस्था, आंबेडकर अकादमी, सातारा.पेज क्र. 229.
3. चक्रवर्ती विद्युत, हाजरा सुगाती, सत्ता संपादन भारतातील स्थिती, सागे भाषा पब्लिकेशन्स, न्यु दिल्ली. पेज क्र. 22.
4. बापट राम (संपादक चौसाळकर अशोक), भारतीय राजकारण : मर्म आणि वर्म, लोकवाड्मय गृह, मुंबई. पेज क्र. 84.
5. संपादक जावळेकर शरद, जोशी वसूधा, जाधव लता, म्हसदे रविंद्र, सामाजिक परिवर्तन चिकित्सा आणि भवितव्य, सुगावा प्रकाशन, पुणे. पेज क्र. 101.
6. www.bbc.com

**आधारग्रंथ**

1. पळशीकर सुहास, समकालीन भारतीय राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
2. संपादक व्होरा राजेन्द्र, पळशीकर सुहास, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
3. वर्तमानपत्रातील अग्रलेख दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. सकाळ, दै. महाराष्ट्र टाईम्स.
4. www.weeklysadhana.in



Scanned with CamScanner